ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

# पनवेल महापालिका क्षेत्रातील बालकामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे अध्ययन

**डॉ. बी.एस. पाटील**

*एम.ए. सेट, पीएच.डी. अर्थशास्त्र, एम.ए. मानसशास्त्र*

*सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख*

*प्रभारी एम.ए. अर्थशास्त्र*

**सारांश-**

*आधुनिक युग असूनही श्रीमंत आणि गरीब अशा दोन प्रमुख वर्गात समाजाची विभागणी झाली आहे. जगातील कोणत्याही देशात श्रीमंतांच्या तुलनेत गरीब लोकांची संख्या फारच जास्त आहे. श्रीमंतांजवळ पैसा आणि संपत्ती असल्यामुळे ते अधिकाधिक श्रीमंत होत आहेत. याउलट गरीबांजवळ पैसा आणि अन्य संसाधनांचा तुटवडा असल्यामुळे त्यांना कायम गरिबीतच जीवन जगावे लागते. जागतिक स्तरावर वयोगट ९-१४ वर्षातील ९.९ प्रतिशत बालकामगार आहेत आणि यापैकी एकट्या भारतात ५ प्रतिशत आहेत त्यामुळे भारतातील बालकामगारांसाठी फार प्रभावी योजना तयार करून हा शाप मिटविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.* पालकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे बालकांना काम करावे लागत आहे, बालश्रमिक प्रथा मुळातच दारिद्र्य असल्यामुळे निर्माण झाली आहे, बालश्रमिक प्रथा  बंद करण्यासाठी सरकारचे प्रयत्न अपुरे आहेत, मुलांना कामावर ठेवणारे व्यावसायिक या प्रथेस जबाबदार आहेत, अनुसूचित जमाती,अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गातील बाल श्रमिकांचे प्रमाण फार जास्त आहे, हॉटेल, ग्यारेज आणि वीटभट्टीवर सर्वाधिक बालकामगार आहेत.

cc BY

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

**प्रस्तावना -**

आधुनिक युग असूनही श्रीमंत आणि गरीब अशा दोन प्रमुख वर्गात समाजाची विभागणी झाली आहे. जगातील कोणत्याही देशात श्रीमंतांच्या तुलनेत गरीब लोकांची संख्या फारच जास्त आहे. श्रीमंतांजवळ पैसा आणि संपत्ती असल्यामुळे ते अधिकाधिक श्रीमंत होत आहेत. याउलट गरीबांजवळ पैसा आणि अन्य संसाधनांचा तुटवडा असल्यामुळे त्यांना कायम गरिबीतच जीवन जगावे लागते. म्हणूनच श्रीमंत हे श्रीमंतच होत जातात आणि गरीब हे गरीबच होत जातात. श्रीमंत वर्गातील पुरुष मंडळी ही आपल्या उत्पन्नातून त्यांच्या कुटुंबियांच्या सर्व गरजा योग्य प्रकारे पूर्ण करू शकतात. त्यामुळे श्रीमंत वर्गातील स्त्रिया आणि

मुलांना उत्पन्न मिळविण्यासाठी काम करण्याची गरज नसते. याउलट गरीब वर्गातील पुरुष मंडळी काम करीत असली तरी, त्यापासून त्यांना मिळणारे उत्पन्न इतके मर्यादीत असते की, त्या उत्पन्नातून त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दैनंदिन जीवनावश्यक गरजा देखील पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे गरीब कुटुंबातील पुरुष, स्त्रिया आणि वेळप्रसंगी लहान मुले सुद्धा आपल्या कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी कामावर जाऊ लागतात आणि मिळेल ते काम विपरीत परिस्थितीत अल्पशा मजुरीवर सेवायोजकांच्या इच्छेनुसार कितीही वेळ करू लागतात. त्याचा त्यांच्या जीवन पद्धतीवर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

भारतात १८ व्या शतकात बालश्रमिक पद्धतीची सुरुवात झाली. हळूहळू त्यांची स्थिती गुलामासारखी झाली. बालकांना रोजगाराऐवजी शाळेत पाठवावे, त्यांचा सर्वांगीण विकास होऊ द्यावा आणि ते शारीरिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतरच म्हणजे १८ वर्षानंतरच रोजगारास घ्यावे असे तत्वतः सर्वांना मान्य होते, परंतु कमी उत्पन्नामुळे गरीब कुटुंबातील बालकांना कामावर जावे लागते. परिणामी परत तेच चक्र त्यांच्या आयुष्यभर चालू राहते. निकृष्ट काम, निकृष्ट दर्जा, कमी वेतन, जास्त वेळ काम, प्रतिकूल कामाची परीस्थीती, सरकारचे दुर्लक्ष आणि श्रीमंताचे सरकार, तसेच मालकाचा फायदा ज्यामध्ये उत्पादनाचा कमी खर्च, कमी वेतन, संघटनाच्या जाळ्यातून सुटका, जास्त वेळ काम इत्यादीमुळे या अत्यंत प्रगतशील युगात देखील लहान मुले व मुली काम करताना आढळून येतात याचाच खेद वाटतो. दुर्दैवाने श्रीमंतांना गरिबांनी कधीच श्रीमंत होऊ नये असे वाटत असल्यामुळे देशात दारिद्र्य कायम राहते असे अर्थतज्ञ नर्क्स म्हणतात.

जागतिक स्तरावर वयोगट ९-१४ वर्षातील ९.९ प्रतिशत बालकामगार आहेत आणि यापैकी एकट्या भारतात ५ प्रतिशत आहेत त्यामुळे भारतातील बालकामगारांसाठी फार प्रभावी योजना तयार करून हा शाप मिटविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**अध्ययनाची व्याप्ती-**

वर्तमान अध्ययन पनवेल महापालिका क्षेत्रापुरतेच मर्यादीत आहे. यामध्ये सर्व बाल कामगारांचे सर्वेक्षण करण्यात आले. शहरीकरण आणि विकास कश्याप्रकारे बालश्रमिकांचा बळी घेतात यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**अध्ययनाची विवेकशीलता -**

बालश्रम हा आपल्या समाजाला सामाजिक विषमता आणि अपुरे सरकारी प्रयत्न यामुळे लागलेला शाप आहे. अनेक देशात बालकांना कामावर घेण्यास बंदी घालण्यात आली आहे, परंतु भारतात मात्र अत्यंत कडक कायदे असून देखील केवळ कायद्यांच्या अमलबजावणी अभावी कोवळ्या जीवांचा निर्दयी बळी दिला जातो. त्यामुळे या अध्ययनाची आवश्यकता आहे असे वाटले. जर बालश्रमिक प्रथा बंद करावयाची असेल तर कठोर उपायांची आवशकता आहे. सर्वात अगोदर पालकांना असा रोजगार दिला पाहिजे ज्यामुळे कुटुंबाच्या सर्व आवश्यक गरजा पूर्ण होतील आणि बालकांना काम करण्याची गरज भासणार नाही.

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

**अध्ययन समस्या -**

आजपर्यंत बालश्रमिक कमी करण्यासाठी अनेक उपाय करण्यात आले, परंतु त्याचा फारसा उपयोग तर झालाच, नाही उलट नियमांच्या पळवाटा शोधून ही प्रथा कायम ठेवण्याकरिता श्रीमंतानी नियमित प्रयत्न केल्याचे आढळून आले आहे. या अध्ययनात योग्य उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**गृहिते -**

- बालश्रमिक प्रथा पालकांच्या कमी उत्पन्नामुळे निर्माण झाली आहे.
- बालश्रमिक प्रथा बंद करण्यासाठी सरकारचे प्रयत्न अपुरे आहेत.
- मुलांना कामावर ठेवणारे व्यावसायिक या प्रथेस जबाबदार आहेत.

**उद्दिष्ट्ये -**

- बालश्रमिक अवस्थेच्या कारणांचा शोध घेणे.
- बालश्रमिक प्रथा दूर करण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांचे अध्ययन करणे.
- बालश्रमिक प्रथा बंद करण्यासाठी उपाय सुचवणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा -**

संदर्भ साहित्याचा आढावा घेणे अतिशय जिकीरीचे कार्य आहे. त्यामुळे याचे दोन भाग करण्यात आले आहेत : एक -भूतकाळ आणि वर्तमानकाळाने उपलब्ध करून दिलेली सैद्धांतिक रचना, दोन- वर्तमानकालीन अध्ययन.

**अध्ययनाची पद्धती -**

तथ्य संकलन : वरील उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीयक स्रोतांच्या माध्यमाने आकडेवारी गोळा करण्यात आली.प्राथमिक आकडेवारी प्रत्यक्ष अनुसूचीच्या माध्यमाने ८७ बालकामगारांना प्रत्यक्ष प्रश्न विचारून गोळा करण्यात आली आहे. जेवढी मुले सापडली त्या सर्व मुलांकडून अनुसूची भरून घेण्यात आली. द्वितीयक आकडेवारी विविध सरकारी अहवालांच्या सहाय्याने गोळा करण्यात आली आहे.

**तथ्यांचे विश्लेषण -**

या अध्ययनात ८७ बालश्रमिकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्या बालकांच्या पालकांच्या उत्पन्नाचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनात आले की, पालकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे या कोवळ्या लेकरांना काम करावे लागत आहे.

**सारणी क्रमांक.१**

**पालकांचे प्रतिमहिना उत्पन्न**

| उत्पन्न पातळी | कुटुंबांची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| ० - १००० | २३ | २६.४४ |
| १००१ - २००० | २२ | २५.२९ |

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

| | | |
|---|---|---|
| २००१ - ३००० | २६ | २९.८९ |
| ३००१ - ४००० | ०९ | १०.३४ |
| ४००१ - ५००० | ०७ | ८.०४ |

स्रोत - प्राथमिक सर्वेक्षण २०१-१८

वरील सारणीवरून स्पष्ट होते की, रुपये ० - १००० उत्पन्न असणारी कुटुंबे २६.४४ प्रतिशत आहेत, ज्यांच्या उत्पन्नातून त्यांच्या कोणत्याच गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. रुपये १००१ - २००० उत्पन्न असणारी कुटुंबे २५.२९ प्रतिशत आहेत ज्यांच्या साध्या अन्नाची गरजा पूर्ण होऊ शकते, परंतु शिक्षण, आरोग्य यासाठीमात्र अजिबात खर्च करू शकत नाहीत. रुपये २००१-३००० उत्पन्न असणारी २९.८९ कुटुंबे आहेत, यांचे उत्पन्न जरी जास्त वाटत असेल तरी, यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या जास्त आहे, त्यामुळे यांच्याही गरजा पूर्ण करणे कठीण आहे. रुपये ३००१ - ४००० उत्पन्न असणारी कुटुंबे अगदीच कमी म्हणजे १०.३४ प्रतिशत असल्यामुळे एकूण बाल कामगारांशी तुलना करता यांचे उत्पन्न जरी ठीक वाटत असले, तरी हे प्रमाण फार नगण्य आहे, ज्यामुळे यांनादेखील आपल्या गरजा पूर्ण करणे कठीण आहे. रुपये ४००१-५००० उत्पन्न असणारी कुटुंबे ८.०४ प्रतिशत आहेत, ज्यांचे उत्पन्न जगण्यासाठी आपणास जरी पुरेशे वाटत असले, तरी या दुर्दैवी बालकांची अन्न ही गरज सोडली तर शाळा, आरोग्य आणि इतर गरजा पूर्ण करणे अत्यंत कठीण आहे.

थोडक्यात अल्प उत्पन्नामुळे या ८७ बालकांना कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी काम करावे लागते.परंतु स्वत:च्या मात्र कोणत्याही गरजा या बाल कामगारांना पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे या मुलांचे संपूर्ण जीवन व्यर्थ जाते.

**सारणी क्रमांक.२**

**कामाचे ठिकाण आणि स्वरूप**

| कामाचे ठिकाण | बाल कामगारांची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| हॉटेल | ३१ | ३५.६३ |
| ग्यारेज | २७ | ३१.०३ |
| दुकान | १४ | १६.०९ |
| रस्त्यावर वस्तू विक्री | ११ | १२.६४ |
| वीटभट्टी | ४ | ४.६० |

स्रोत - प्राथमिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील सारणीवर प्रकाश टाकल्यास लक्षात येते की, हॉटेल मध्ये सर्वाधिक म्हणजेच ३५.६३ प्रतिशत बाल कामगार कामासाठी जातात, त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर असे कळले की, या व्यवसायात एवढे बाल श्रमिक का आहेत? त्याचे कारण म्हणजे, याठिकाणी दोन वेळ जेवणाची, राहण्याची आणि कपड्यांची सुविधा

मिळते, यामुळे त्यांना मिळणारे वेतन बचत होते व कुटुंबाकडे दिले जाते. हॉटेलमध्ये बालकांना कामावर घेण्याचे कारण हे आहे की, लहान मुले या व्यवसायात विनातक्रार अविरत काम करतात व मोठ्या माणसांच्या तुलनेत ती कमी थकतात. तसेच या लहान मुलांना जास्त पगार व सुविधा देण्याची आवश्यकता भासत नाही.

हॉटेलनंतर दुसऱ्या क्रमांकांचे क्षेत्रग्यारेज आहे, जेथे ३१.०३ प्रतिशत मुले काम करतात. हा व्यवसाय देखील लहान मुलांनाच कामावर ठेवने पसंत करतो, कारण याव्यवसायात लहान मुले मोठ्या प्रमाणात मदत करतात व कमी थकतात.या व्यवसायात मुलांना अत्यंत हीन वागणूक मिळते, परंतु आपल्या कौटुंबिक सदस्यांची काळजी घेण्यासाठी हे काम वेदनादायक असूनदेखील करावे लागते.

दुकानांमध्ये १६.०९ प्रतिशत मुले काम करतात येथेदेखील १२ ते १४ तास काम करावे लागते. एवढेच की, येथे दुकानाच्या आत काम असते. तसेच जुळणी उद्योग, कोळसा खाण, लॉकतयार करणे, फटाके तयार करणे, डायमंड, काच उद्योग, इत्यादी ठिकाणी कार्य करतात.

रस्त्यावर वस्तू विक्री (१२.६४ प्रतिशत मुले) व वीटभट्टी (४.६० प्रतिशत मुले) व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांमध्ये मुलींचेच प्रमाण जास्त आहे १५ पैकी १३ मुली याठिकाणी काम करताना आढळून आल्या. हे अत्यंत अंगमेहनतीचे क्षेत्र आहे. याठिकाणी काम केल्यामुळे लहान वयातच ही मुले अनेक आजारांनी पिडीत होतात. या मुली कामावरून घरी आल्यानंतर स्वयंपाक करणे, कपडे धुणे, इंधन गोळा करणे आणि स्वच्छता करणे इत्यादि कामेही करावे लागतात.

**सारणी क्रमांक - ३**

**जातीनिहाय्य बाल श्रमिकांचे प्रमाण**

| कामाचे ठिकाण | बाल कामगारांची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| **अनुसूचित जमाती** | २७ | ३१.०३ |
| **अनुसूचित जाती** | २९ | ३३.३३ |
| **इतर मागासवर्गीय** | १८ | २०.६९ |
| **अन्य जातीचे** | १३ | १४.९४ |

स्रोत - प्राथमिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील तालिकेत दाखविल्याप्रमाणे महापालिका क्षेत्रातील बालश्रमिकांपैकी ३९.०३ प्रतिशत बाल श्रमिक एकट्या अनुसूचित जमातीचे आहेत, जेथे शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे आणि गरिबी मात्र भयंकर टोकाची. ३३.३३ प्रतिशत बाल श्रमिक एकट्या अनुसूचित जातीचे आहेत, जेथे पराकोटीचे दारिद्र्य आहे. देशाच्या लोकसंखेत सर्वाधिक वाटा असणाऱ्या इतर मागासवर्गीय वर्गातील २०.६९ प्रतिशत बाल श्रमिक आहेत, तर देशाच्या एकूण लोकसंखेत मुळातच अन्य जातींचे प्रमाण कमी असल्यामुळे बाल श्रमिकांचे प्रमाण

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

देखील कमी आहे.

**बालश्रमिक तयार होण्यासाठी कारणीभूत घटक -**

१. **दारिद्य** –भारतातील बाल श्रमिकांचे मूळ गरिबीतच आहे.

२. **शिक्षण** – शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा असल्यामुळे करोडो बालके शिक्षणापासून वंचित आहेत.

३. **रोजगार संधींचा अभाव** – भारतातील गरीब जनतेला वर्षभर योग्य वेतनाचा रोजगार उपलब्ध नसल्यामुळे बालकांना काम करावे लागते.

४. **सामजिक जागरूकता** – भारतातील बाल श्रमिकांच्या शोषणाबाबत जागरूकता नाही.

५. **इच्छा शक्तीचा अभाव** – भारतातील राजकारणी, अधिकारी, व्यावसायिक आणि श्रीमंत वर्गाला येथे कायम गुलामगिरी हवी आहे त्यामुळे बालश्रमिक प्रथा निरंतरचालू आहे.

**निष्कर्ष -**

- पालकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे बालकांना काम करावे लागत आहे.
- बालश्रमिक प्रथा मुळातच दारिद्र्य असल्यामुळे निर्माण झाली आहे.
- बालश्रमिक प्रथा बंद करण्यासाठी सरकारचे प्रयत्न अपुरे आहेत.
- मुलांना कामावर ठेवणारे व्यावसायिक या प्रथेस जबाबदार आहेत.
- अनुसूचित जमाती,अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गातील बाल श्रमिकांचे प्रमाण फार जास्त आहे.
- हॉटेल, ग्यारेज आणि वीटभट्टीवर सर्वाधिक बालकामगार आहेत.

**उपाय -**

१. रहिवासी शिक्षणाची व्यवस्था करावी आणि पालकांना योग्य मोबदल्यासह वर्षभर काम द्यावे.

२. दारिद्र्य निर्मुलनासाठी कठोर उपाय योजावे.

३. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाची आणखी व्याप्ती वाढवावी.

४. शिक्षणाच्या अधिकाराची व अनुदानाची कक्षा विस्तारावी.

५. गरीबांच्या अपत्य संख्येवर नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा.

६. गरिबांना उच्चशिक्षणानंतर नोकरीची हमी द्यावी.

**संदर्भ -**

१. डॉ. सुधीर बोधनकर आणि डॉ. साहेबराव चव्हाण, श्रम अर्थशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती मार्च २००८.

२. कि. का. चौधरी (संपादक), रायगड जिल्हा ग्याझेटीयर, महाराष्ट्र, २०१६-१७.

३. वार्षिक अहवाल, महाराष्ट्र राज्य २०१६-१७